

'गटबाजी करु नका, सर्वांना विश्वासात घेऊन काम करा'

e Paper

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

वर्ष 4थे

www.metrocityvrutant.in शुक्रवार दिनांक 19/09/२०२५ METRO CITY VRUTANT

संपादक : रफी हुसेन || पिंपरी चिंचवड व पुणे || पान 4 || अंक 221 || RNI - MAHMAR /2021/51259 || metrocity924@gmail.com

# “एकतर हा जीआर मागे घ्या, नाहीतर...”

## मराठा आरक्षणाच्या जीआरबाबत छगन भुजबळांचं मोठं विधान

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



मुंबई : गेल्या काही दिवसांपासून राज्यात मराठा आणि ओबीसी आरक्षणाच्या मुद्यांवरून चांगलंच राजकारण तापलेलं आहे. यातच कुणबी नोंद असलेल्या मराठा समाजाला कुणबी जात प्रमाणपत्र देण्याबाबत राज्य सरकारने २ सप्टेंबर रोजी अध्यादेश काढला. मात्र, राज्य सरकारच्या या निर्णयानंतर ओबीसी समाजाच्या नेत्यांनी नाराजी व्यक्त केली.

या अध्यादेशामुळे ओबीसींवर अन्याय झाल्याची भावना व्यक्त केली जात आहे.या सर्व घडामोडींवर बोलताना आता ओबीसी नेते तथा मंत्री छगन भुजबळ यांनी भाष्य करत एक मोठं विधान केलं. तसेच हैदराबाद गॅझेटच्या जीआरविरोधात मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली होती. ही याचिका न्यायालयाने फेटाळली असं वृत्त माध्यमांमध्ये आहे. यावरही भुजबळांनी प्रतिक्रिया दिली.मराठा समाजाला कुणबी जात प्रमाणपत्र देण्याबाबतच्या सरकारच्या निर्णयाविरोधात रिट याचिका दाखल करण्यात आल्याचंही त्यांनी स्पष्ट केलं. तसेच एकतर हा जीआर मागे घ्या, नाहीतर त्या जीआरमध्ये आवश्यक त्या सुधारणा करा’ अशी मागणी छगन भुजबळ यांनी एका कार्यक्रमात बोलताना केली आहे.ते म्हणाले, “मला माध्यमांना सांगायचं आहे की एक बातमी अशी येत आहे की मराठा आरक्षणाच्या विरुद्ध जो अर्ज दाखल केला होता तो फेटाळला आणि मराठा समाजाचा मोठा विजय झाला अशा बातम्या येत आहेत. मात्र, माध्यमांनी व्यवस्थित समजून घ्यावं की हा जीआर निघाल्यानंतर अनेकांनी आपआपल्या पद्धतीने उच्च न्यायालयात धाव घेतली होती. त्यातील काही लोकांनी जनहित याचिका दाखल केली होती.आम्ही त्यांना सांगितलं की हे चुकीचं होईल. त्यानंतर आम्ही वकिलांबरोबर ८ ते १० दिवस चर्चा केली. तेव्हा त्यांनी सांगितलं की आपल्याला जनहित याचिका नाही तर रिट याचिका दाखल करायची. मग ज्यांनी जनहित याचिका केली होती त्यांनी रिट याचिका दाखल करण्यासाठी परवानगी मागितली.

तेव्हा न्यायालयाने सांगितलं की आम्ही ही याचिका फेटाळतो आणि तुम्ही रिट याचिका दाखल करा. पण काही बातम्यांमुळे चुकीचा गैरसमज लोकांमध्ये पसरत आहे”, असं छगन भुजबळांनी म्हटलं.

# भारतीय लष्कराचे ऐतिहासिक पाऊल!

## तीन शहरांमध्ये एकात्मिक लष्करी केंद्रे!

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



नवी दिल्ली : भारतीय लष्कराने तिन्ही सशस्त्र दलांच्या एकत्रिकरणाच्या दिशेने महत्त्वाचे ऐतिहासिक पाऊल उचलत देशात प्रथमच एकात्मिक लष्करी केंद्रे स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे. त्याचबरोबर लष्कर, नौदल व हवाईदल यांच्या शिक्षण शाखांचेही विलिनीकरण करून त्रि-सेवा शिक्षण दल उभारण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे.भविष्यातील बदलते युद्धतंत्र लक्षात घेऊन हे दोन्ही महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत.अलीकडेच कोलकाता येथे झालेल्या संयुक्त कमांडर परिषदेच्या अखेरच्या दिवशी हा निर्णय जाहीर करण्यात आला. सध्या सुरू असलेल्या थिएटर कमांड्स उभारणीवरील चर्चेच्या पार्श्वभूमीवर हे पाऊल विशेष महत्त्वाचे मानले जात आहे.संयुक्त लष्करी केंद्र म्हणजे पायदळ, नौदल आणि हवाईदल यांच्या सर्व सोयीसुविधा आणि सेवा (कारवाया) एकत्र आणणे. त्यात लॉजिस्टिक, दुरुस्ती व देखभाल, साठा व पुरवठा, पायाभूत सुविधा यांच्याच बरोबर त्यांच्या रणनीतिक कारवायांचाही समावेश असेल. तिन्ही दलांपैकी एकाच्या हाती केंद्राचे मुख्य नेतृत्व वा सूत्रे असतील अशी प्राथमिक रचना असणार आहे.यामुळे मनुष्यबळ, साधनसामग्री व संरचना यांचा सर्वोत्तम वापर करणे शक्य होईल. भारतीय लष्कराचा भविष्यातील प्रवास हा थिएटर कमांड्सच्या दिशेने होणार असून त्याची पहिली चुणूक या एकात्मिक केंद्रांच्या माध्यमातून पाहायला मिळेल

मे महिन्यात पार पडलेल्या ऑपरेशन सिंदूरमधून भारतीय लष्करालाही अनेक धडे शिकता आले, भविष्यातील सर्व युद्धे ही ‘नेटवर्क सेंट्रीक’ असणार हा यातील सर्वात महत्त्वाचा धडा होता.

त्यामुळे त्यादृष्टीने तयारी करण्यासाठी एकात्मिक केंद्रांचे उचलण्यात आलेले पाऊल सर्वाधिक महत्त्वाचे आहे.

ऑपरेशन सिंदूर हे तिन्ही दलांचे एकत्रित यश होते आणि त्या दरम्यान तिन्ही दलांचा एकत्रित उत्तम समन्वय अधोरेखितही झाला.

# भाजपा युवा मोर्चाच्या वतीने रविवारी 'नमो युवा रन' मॅरेथॉन आयोजन

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

भाजपपिंपरी चिंचवड : भारतीय जनता युवा मोर्चा पिंपरी चिंचवड शहराच्या वतीने देशाचे पंतप्रधान माननीय नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त 'नमो युवा रन' मॅरेथॉन आयोजन करण्यात आले आहे.ही मॅरेथॉन रविवार, दि. २१ सप्टेंबर रोजी सकाळी ६ वाजता पिंपळे सौदागर येथील लिनीयर गार्डन, कोकणे चौक ते ८ टु ८० पार्क येथे केले आहे.या कार्यक्रमाचे आयोजन भाजप महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली व पिंपरी चिंचवड भाजपा शहर अध्यक्ष शत्रुघ्न काटे यांच्या अध्यक्षतेखाली आणि पिंपरी चिंचवडचे माजी पोलीस आयुक्त आयपीएस अधिकारी कृष्ण प्रकाश यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न होणार आहे.त्याचप्रमाणे आमदार महेश लांडगे, आमदार शंकर जगताप, आमदार उमा खापरे, आमदार अमित गोरखे तसेच भाजप युवा मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष श्री.अनुप मोरे, भाजपा युवा मोर्चा पिंपरी चिंचवड अध्यक्ष दिनेश यादव, भाजपा युवा मोर्चा सरचिटणीस सुदर्शन पाटसकर, नमो युवा रनचे संयोजक अमृत मारणे, युवा मोर्चा प्रदेश सचिव अजित कुलथे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत.युवकांमध्ये व्यसनमुक्तीचा संदेश पोहोचवणे, देशभक्ती आणि निरोगी जीवनशैलीचा प्रसार करणे हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश आहे. ही मॅरेथॉन रन सर्व वयोगटातील स्पर्धकांसाठी आयोजित केली असून सहभागी स्पर्धकांना नोंदणी व प्रवेश विनामूल्य आहे.




स्पर्धेचे आयोजक भारतीय जनता युवा मोर्चाच्या वतीने करण्यात आले असून जास्तीत जास्त युवकांनी व नागरिकांनी या स्पर्धेत सहभागी व्हावे असे आवाहन भाजपा युवा मोर्चाचे प्रदेश अध्यक्ष अनुप मोरे यांनी केले आहे.

# मावळ तालुक्यातील उद्यान विकासासाठी ४ कोटींचा निधी

## नमो उद्यान योजनेतून तळेगाव, लोणावळा नगरपरिषद तसेच वडगाव व देहू नगर पंचायतींना लाभ

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

मावळ : मावळ तालुक्यातील नागरी भागातील नागरिकांसाठी आनंदाची बातमी आहे. तालुक्यातील नगरपरिषद व नगरपंचायत हद्दीतील उद्यानांच्या विकासासाठी ‘नमो उद्यान’ योजनेअंतर्गत तब्बल ४ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे.

या कामांना शासनाकडून प्रशासकीय मान्यताही प्राप्त झाली असून, लवकरच या ठिकाणी उद्यान विकासाची कामे सुरू होणार आहेत, अशी माहिती मावळचे आमदार सुनील शेळके यांनी दिली.

**या मंजूर निधीचा तपशील पुढीलप्रमाणे आहे :**

* तळेगाव दाभाडे नगरपरिषद – रु. १ कोटी* लोणावळा नगरपरिषद – रु. १ कोटी* वडगाव नगरपंचायत – रु. १ कोटी* श्री क्षेत्र देहू नगरपंचायत – रु. १ कोटी




मावळ तालुक्यातील या चारही महत्त्वाच्या शहरांमध्ये अनेक वर्षांपासून नागरिक उद्यान विकासाची मागणी करीत होते. उद्यानांची दुरवस्था, अपुरी सुविधा आणि वाढते शहरीकरण यामुळे नागरिकांना विरंगुळ्यासाठी व मुलांना खेळण्यासाठी योग्य जागा उपलब्ध होत नव्हती. नमो उद्यान योजनेतून मिळालेल्या निधीमुळे या ठिकाणचे उद्यान आधुनिक स्वरूपात सज्ज होणार असून, नागरिकांसाठी आरोग्यदायी वातावरण निर्माण होईल.

आमदार सुनील शेळके म्हणाले की, “महायुती सरकारच्या माध्यमातून मावळ तालुक्यातील नागरी भागांना उद्यान विकासासाठी ४ कोटींचा निधी मिळवून दिल्याचा मला आनंद आहे.

या उपक्रमामुळे स्थानिक नागरिक, महिला, ज्येष्ठ नागरिक व लहान मुलांना दर्जेदार सुविधा असलेली उद्याने उपलब्ध होतील. मावळ तालुक्याच्या सर्वांगीण विकासासाठी मी सातत्याने प्रयत्नशील राहणार आहे.

”आमदार शेळके यांनी यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार तसेच नगर विकास विभागाचे आभार मानले.

नागरिकांसाठी उद्याने ही केवळ मनोरंजनाची साधने नसून, सामाजिक संवादाचे व आरोग्य संवर्धनाचे महत्त्वाचे केंद्र आहेत.

त्यामुळे या निधीमुळे मावळ तालुक्यातील नागरी भागातील नागरिकांच्या दीर्घकाळच्या अपेक्षांची पूर्तता होणार आहे, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे.

# महापालिका शाळांना मिळतेय पालकांची पसंती!

>>> | दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी : पिंपरी चिंचवड महापालिकेच्या शाळांमध्ये गेल्या काही वर्षांमध्ये विद्यार्थ्यांची संख्या सातत्याने वाढत आहे. यू-डायस (UDISE+) च्या आकडेवारीवरून हे स्पष्ट झाले आहे. एकीकडे बहुतांश महापालिका शाळांमधील विद्यार्थ्यांची संख्या घटत असताना पिंपरी चिंचवड महापालिकेत विद्यार्थ्यांची संख्या वाढत आहे. यावरून या शाळांचा दर्जा दिवसेंदिवस अधिक सुधारत असल्याचे चित्र आहे. तसेच या शाळांच्या स्वतंत्र मूल्यमापनात शैक्षणिक निकालांमध्ये लक्षणीय सुधारणा होत आहे.




यू-डायसच्या आकडेवारीनुसार पिंपरी चिंचवड महापालिकेच्या १३४ शाळांमध्ये शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये ४८ हजार १५३ इतकी असलेली प्रवेशसंख्या वर्ष २०२३-२४ मध्ये ५० हजार ५८९, तर शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये ५० हजार ७४९ वर पोहोचली आहे. तर चालू शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये ८ सप्टेंबरपर्यंतच ही संख्या ५४ हजार ४१८ इतकी झाली आहे. यामध्ये मुलींचे प्रमाण सातत्याने वाढत असून ते शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये २४ हजार ७८८ वरून वर्ष २०२३-२४ मध्ये २५ हजार ९०२ आणि शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये २५ हजार ९२२ इतके झाले आहे.महापालिकेच्या शाळांमध्ये केवळ प्रवेशसंख्याच वाढत नाही, तर मुलांच्या शैक्षणिक गुणवत्तेमध्ये देखील चांगली वाढ दिसून येत आहे.

क्वालिटी कौन्सिल ऑफ इंडिया (Q C I ) च्या मूल्यमापनानुसार प्रारंभीच्या पातळीवरील विद्यार्थ्यांचे प्रमाण शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील २८ टक्क्यांवरून वर्ष २०२४-२५ मध्ये १३ टक्क्यांवर आले, तर उच्च पातळीवर पोहोचलेल्या विद्यार्थ्यांचे प्रमाण ०.५ टक्क्यांवरून ६ टक्क्यांपर्यंत वाढले आहे. यामध्ये विशेषतः प्राथमिक वर्गांच्या निकालांमध्ये लक्षणीय सुधारणा दिसून आली आहे. इयत्ता दुसरीतील प्रारंभी पातळीवरील विद्यार्थी ३० टक्क्यांवरून ७ टक्क्यांपर्यंत कमी झाले आहेत, तर प्रगत विद्यार्थ्यांचे प्रमाण ० टक्क्यांवरून थेट २५ टक्क्यांवर गेले आहे.पिंपरी चिंचवड महापालिकेच्या शाळांमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना महापालिकेच्या शिक्षण विभागाकडून राबवण्यात येत असलेल्या विविध उपक्रमांचा फायदा होत आहे. महापालिकेच्या २११ बालवाड्यांमधील ६ हजारांपेक्षा जास्त मुलांसाठी बालसुलभ वर्गखोल्या आहेत. मूल्यमापनात प्रारंभिक साक्षरता, अंकगणित व इतर कौशल्यांमध्ये २०–२४ टक्के सुधारणा आढळली आहे. याशिवाय 'स्पंदन' कार्यक्रम सामाजिक-भावनिक शिक्षण व जीवनकौशल्यांवर भर देत आहे. 'इंग्रजी अॅज सेकंड लँग्वेज' (ESL) उपक्रमांतर्गत २७ हजारांपेक्षा जास्त विद्यार्थी इंग्रजी भाषेचा वापर आत्मविश्वासाने करीत आहेत. 'द आर्ट बॉक्स' प्रदर्शन व 'जल्लोष शिक्षणाचा' यांसारखे सांस्कृतिक उपक्रम विद्यार्थ्यांचा दृष्टीकोन विस्तारण्यास मदत करीत आहेत. तर 'भारत दर्शन' दौऱ्यांतून गुणवंत विद्यार्थ्यांना राष्ट्रीय शैक्षणिक अनुभव मिळत आहेत.

याशिवाय सुरक्षित शिक्षण वातावरणासाठी महापालिकेने एनसीपीसीआर (N C P C R) व एनसीईआरटी (N C E R T ) मार्गदर्शक तत्त्वांनुसार शाळा सुरक्षा लेखापरीक्षण सुरू केले आहे.

पोलीस विभागाच्या 'पोलीस काका' व 'दामिनी स्क्वॅड' यांच्या सहकार्याने तसेच मुस्कान फाउंडेशन व अर्पण यांच्या माध्यमातून शाळांमध्ये बालसंरक्षण प्रशिक्षण दिले जात आहे. शाळांमध्ये सध्या २३ समुपदेशक कार्यरत असून शाळा व्यवस्थापन समित्या सुरक्षा व बालसंरक्षण उपाययोजनांवर काटेकोरपणे लक्ष देत आहेत.

# एस.बी.पाटील पब्लिक स्कूलच्या विद्यार्थ्यांची अॅक्रोबॅटिक स्पर्धेत ११ सुवर्ण पदकांची कमाई

>>> | दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी : पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या रावेत येथील एस. बी. पाटील पब्लिक स्कूलच्या विद्यार्थ्यांनी १९ वर्षाखालील गटात अॅक्रोबॅटिक स्पर्धेत उत्तुंग कामगिरी करत ११ सुवर्ण व २ रौप्य पदकांची कमाई केली आहे.




पिंपरी चिंचवड महानगरपालिका व पुणे जिल्हा यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हास्तरीय शालेय अॅक्रोबॅटिक स्पर्धा २०२५ - २६ (दि. १३) निगडी येथील एलाइट फिटनेस अकॅडमी येथे आयोजित करण्यात आल्या होत्या.या स्पर्धेत पुणे, पिंपरी चिंचवड शहर आणि पुणे जिल्ह्यातील विविध शाळांमधील विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन कौशल्यपूर्ण सादरीकरण केले. यामध्ये एस. बी. पाटील पब्लिक स्कूल मधील विविध गटातील विद्यार्थ्यांनी दैदिप्यमान कामगिरी केली. यामध्ये मुलींच्या संघात इयत्ता ६ वी मधील वीरा काटकर, वैदेही निकम आणि आर्या थोरात यांनी सुवर्ण पदक जिंकले. सावनी बडवे (इयत्ता ६ वी) आणि ओम पाटील (इयत्ता ९ वी) यांनी मिश्र जोडीत सुवर्ण पदक मिळवले.मुलांच्या संघात इयत्ता ८ वी मधील रुद्र जंगलीवाड, अमित कोडगुनूरा, राजवीर अंजुरे, आदित्य खाडे, पवन खैरनार आणि इयत्ता ६ वी मधील अनय पवार यांनी सुवर्ण पदक मिळवून शाळेचा मान वाढविला.

स्पर्धेत सुवर्णपदक जिंकलेल्या सर्व विद्यार्थ्यांची विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. मुलींच्या संघात आबोली डोंबाळे (इयत्ता ७ वी) आणि श्रावणी भोंडवे (इयत्ता ७ वी) यांनी रौप्य पदक पटकावले.

प्राचार्या डॉ. बिंदू सैनी, उपप्राचार्या पद्मावती बंडा व क्रीडाशिक्षक धनाजी पाटील यांनी मार्गदर्शन केले.पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्ष पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांनी यशस्वी विद्यार्थ्यांना पुढील विभागीय आणि राज्य स्पर्धेसाठी यशस्वी होण्यास शुभेच्छा देऊन कौतुक केले.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

शुक्रवार दिनांक 19/09/2025

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# 'गटबाजी करु नका, सर्वांना विश्वासात घेऊन काम करा'

## खासदार श्रीरंग बारणे यांच्या नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना सूचना

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



पिंपरी - आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका शिवसेनेला पूर्ण ताकदीने लढायच्या आहेत. त्यादृष्टीने सर्वांनी कामाला लागावे. शिवसेना एक परिवार आहे. त्यामुळे कोणीही गटबाजी करु नये, सर्वांना विश्वासात घेऊन काम करावे, अशा सूचना शिवसेनेचे उपनेते, मावळचे खासदार श्रीरंग बारणे यांनी नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना दिल्या.शिवसेनेचे मुख्य नेते, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आगामी महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मावळमधील पक्ष संघटनेत फेरबदल केले आहेत. पिंपरी-चिंचवड महानगर प्रमुखपदी राजेश वाबळे, मावळच्या जिल्हाप्रमुखपदी राजेश खांडभोर, पिंपरी, चिंचवड आणि मावळ विधानसभा मतदारसंघाच्या समन्वयकपदी बाळासाहेब वाल्हेकर, जिल्हा संघटिकापदी शिला भोंडवे, मावळ तालुकाप्रमुखपदी राम सावंत यांची नियुक्ती केली आहे.

या नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचा खासदार श्रीरंग बारणे यांच्या हस्ते गुरुवारी सत्कार करण्यात आला. यावेळी उपनेत्या सुलभा उबाळे, युवा सेनेचे पश्चिम महाराष्ट्राचे सचिव विश्वजित बारणे, शिवसेना उपजिल्हा प्रमुख दिलीप पांढरकर, राजेंद्र तरस, विशाल हुलावळे, शिवसेना महिला तालुका प्रमुख शुभांगी काळंगे, पिंपरी-चिंचवड शहर प्रमुख निलेश तरस, माऊली जगताप, सुनिल हगवणे, मा नगरसेवक बाळासाहेब ओव्हाळ, पिंपरी विधानसभा महिला संघटिका शैला निकम यांच्यास ह पिंपरी, चिंचवड व मावळ तालुक्यातील पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.खासदार बारणे म्हणाले, आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर संघटनेत फेरबदल केले आहेत. नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना काम करण्यास मोठी संधी मिळणार आहे.

शिवसेनेचे जास्तीत-जास्त नगरसेवक, जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य निवडून आणायचे आहेत. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची ताकद आपल्या सर्वांच्या पाठिशी आहे. त्यामुळे निवडणुकीच्या दृष्टीने सर्वांनी कामाला लागावे. संपर्क वाढवावा.

शाखांची बांधणी करावी. तळागातील लोकांना संघटनेशी जोडावे. संघटना अधिक बळकट, मजबूत करावी. तरुणांना शिवसेनेशी जोडावे. शिवसेना हा एक परिवार आहे. त्यामुळे सर्वांनी परिवार म्हणून काम करावे. कोणीही गटबाजी करु नये, प्रत्येकाला विश्वासात घेऊन संघटना वाढवावी.

तत्कालीन मुख्यमंत्री आणि विद्यमान उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मुख्यमंत्री लाडकी बहिण, शासन आपल्या दारी, मुलींच्या शिक्षणासाठी मदत अशा विविध योजना राबविल्या आहेत. या योजना लोकांपर्यंत पोहोचवाव्यात. योजनांचा लाभ लोकांना मिळवून द्यावा.

# पिंपळे निलख–विशाल नगर वाहतुकीला दिलासा; ट्रॅफिक वॉर्डन्सची नियुक्ती !

## सचिन साठे सोशल फाऊंडेशनचा उपक्रम

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



पिंपळे निलख : पिंपळे निलख व विशाल नगर परिसरात दिवसेंदिवस वाढत चाललेल्या वाहनांच्या गर्दीमुळे वाहतूक कोंडीची समस्या गंभीर बनली होती. या पार्श्वभूमीवर सचिन साठे सोशल फाऊंडेशनने पुढाकार घेत महत्त्वाच्या चौकांवर ट्रॅफिक वॉर्डन्सची नेमणूक केली आहे.

या उपक्रमाचा शुभारंभ १५ सप्टेंबरपासून झाला असून वॉर्डन्स प्रत्यक्ष कार्यरत होऊन वाहतूक सुरळीत करण्याचे काम हाती घेत आहेत. नागरिकांच्या शिस्तबद्ध सहभागामुळे या उपक्रमाला यश मिळणार असल्याचा विश्वास व्यक्त करण्यात आला. वाहतूक सुरळीत व सुरक्षित ठेवण्यासाठी नागरिकांनी सहकार्य करणे हीच खरी सामाजिक जबाबदारी आहे, असे आवाहन फाऊंडेशनतर्फे करण्यात आले.या उपक्रमामुळे वाहतूक कोंडी कमी होण्यास मदत होईल, असे मत परिसरातील नागरिकांनी व्यक्त केले. या प्रसंगी उपस्थित मान्यवरांमध्ये प्रदीप पाटील (वाहतूक पोलीस निरीक्षक, सांगवी–वाकड विभाग), शिंदे साहेब (पिं.चिं. महानगरपालिका ड प्रभाग स्थापत्य अधिकारी), तसेच भुलेश्वर नांदगुडे, राजाभाऊ मासुळकर, अशोक बालवडकर, संजय दळवी, काळूशेठ नांदगुडे, अनिल संचेती, आनंद कुंभार, अरविंद रणदिवे, नागेश जाधव, संजय पटेल, गोविंद गायकवाड, रवींद्र साठे, अशोक मेंगळे आणि परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क : 9657409579